# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 27/05/2023 (शनिवार) सायंकाळ

---

## विनयभंग

१) पो.स्टे. सावनेर :— दिनांक २६/०५/२०२३ चे ०९/०० वा. दरम्यान फिर्यादीच्या घराजवळ राहणारा **आरोपी नामे— धर्मेंद्र पुंडलीक बनकर, रा. तेलकामठी कळमेश्वर** याने फिर्यादीस एका वर्षा अगोदर मी तुझ्यावर प्रेम करतो असे बोलला असता फिर्यादीने याबाबत आपल्या आई वडीलांना सांगीतल्यावरून आरोपीने त्यांना माफी मागीतली होती. फिर्यादीचा एम. एस. सी. आय. टी. चा क्लास असल्याने फिर्यादी नियमीत वेळेवर आपले आतेभाऊच्या गाडीवर बसुन सावनेर येथे येत असता नमुद आरोपी सुद्धा तिच्या मागे येवून फिर्यादीचे क्लास सुटल्यानंतर फिर्यादी बस स्टॉप येथे बसची वाट पाहत असता आरोपी हा फिर्यादी जवळ येवून म्हणाला की तु बारावीचा निकाल का सांगीतला नाही यावरून तु विचारणारा कोण? असे फिर्यादीने म्हटले असता फिर्यादीचे हातातील मिठाईचा डब्बा घेतला व गाडीवर बसण्यास बोलला फिर्यादीने बसण्यास नकार दिला अशाप्रकारे ''मी तुझ्यावर प्रेम करतो'' म्हणून फिर्यादीशी जवळीक साधण्याच्या उद्देशाने वेळोवेळी छुप्या पद्धतीने पाठलाग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ३५४(ड) भादवि. सहकलम १२ पोक्सो कायदया अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास मसपोनी मोकासे मो. क्र. ८३८०८५०३५० या करीत आहे.

२) पो.स्टे. सावनेर :— दिनांक २५/०५/२०२३ चे २३/०० वा. दरम्यान फिर्यादी ही आपल्या घरी झोपली असता **आरोपी नामे— पवन अशोक बोबडे, रा. माळेगाव** याने फिर्यादीच्या घरात घुसुन फिर्यादीच्या कमरेवर हात ठेवला असता फिर्यादी उठुन त्यास जाण्यास सांगीतले असता त्याने आपल्या दोघांमधिल गोष्ट दोघांमध्येच राहील असे म्हणून फिर्यादीला दोन्ही हाताने पकडुन फिर्यादीचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ३५४, ४५२ भादवि. कायदया अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोहवा विजय पांडे ब. नं. ७७ मो. क्र. ७३५००५५६६९ हे करीत आहे.

## शारीरिक व मानसिक छळ करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

**पो. स्टे. मौदा** :– फिर्यादी नामे– सौ. आशा राजेश वैद्य, वय २५ वर्ष, रा. आझाद चौक धानला हिचा आरोपी पती नामे– राजेश श्रावन वैदय, वय ३५ वर्ष, रा. आझाद चौक धानला हा दारु पिण्याच्या सवईचा असुन यातील फिर्यादीला नेहमी दारु पिवुन मारतो काही दिवसा पुर्वी यातील फिर्यादीला आरोपीने तिच्या वडीलांकडुन ४०,०००/–रु मागीतले व त्यांनी दिले त्यानंतर फिर्यादीचे मुलीसाठी १० ग्रॅमची सोन्याची चैन बनवुन मागीतली व मुलीच्या वाढदिवसा साठी २०,०००/– रु मागीतले यातील आरोपी हा नेहमी तिला वडीलांकडुन पैश्याची मागणी करत राहतो.

सदर प्रकरणी फिर्यादीचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ४९८ अ भादंवी कलम ३, ४ हुंडाबंदी अधि १९६१ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला असून गुन्हयाचा पुढील तपास पोहवा १६९ गौतम मेश्राम मो. क्र. ९८२२५४५१६९ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर